3 एप्रिल 2005

तरुण भारत

# संत तुकाराम म्हणजे विचारांचा सूर्य – प्रा. भुकेले

**कोल्हापूर / प्रतिनिधी ■**
संत तुकाराम म्हणजे विचारांचा तेजस्वी सूर्य होय, असे प्रतिपादन प्रा. शिवाजीराव भुकेले यांनी केले. ताराराणी विद्यापीठात 'तुकाराम बीज' कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रा. भुकेले पुढे म्हणाले, बहुजन समाजाचे दुःख परखडपणे मांडणाऱ्या आणि धर्म व जातीव्यवस्थेवर प्रहार करणाऱ्या तुकारामांचे विचार बहुजन समाजाच्या मनात अभंग राहिले पाहिजेत. महाराष्ट्रातील सज्जनांना व दुर्जनांनाही वाट दाखविणाऱ्या तुकारामांच्या भाषेचा कठोरपणा हे त्यांच्या भाषेचे सौंदर्य होते.

संत तुकाराम यांनी अध्यात्म व भक्ती यांचे सार्वत्रीकरण न करता सामाजिक नीतीस प्राधान्य दिले. कारण अध्यात्माचे सार्वत्रीकरण केल्यास देशाचा मठ होईल व भक्तीचे सार्वत्रीकरण केल्यास देशाच्या हातात टाळ येईल. म्हणून त्यांनी अध्यात्म आणि भक्तीवर मर्यादा ठेवण्याची भूमिका मांडली.

संस्काराचे लोकविद्यापीठ कुटुंबात असते, हे पटवून देण्याचा प्रयत्न संत तुकाराम महाराजांनी केला, असे सांगून प्रा. भुकेले यांनी संत तुकाराम हे संस्काराचे मुक्त विद्यापीठ, कष्टकऱ्यांचे प्रतिनिधी होते. समाजजीवनाला सामर्थ्याची दिशा देण्याचे काम तुकारामांनी केले, असे ते म्हणाले.

ताराराणी विद्यापीठाचे अध्यक्ष रामराव बेनाडीकर, कार्यकारी अध्यक्ष रा. कृ. कणबरकर, सचिव प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील आदी मान्यवरांसह संस्थेचे विश्वस्त, विविध शाखाप्रमुख उपस्थित होते. सूत्रसंचालन सौ. जयश्री पाटील यांनी केले. प्रा. जयसिंग सावंत यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सौ. अंजली साठे यांनी आभार मानले.



**तुकाराम बीजेनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना प्रा. शिवाजीराव भुकेले. सोबत प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, रा. कृ. कणबरकर.**